वाचा :- १) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे यांचा आदेश क्र. स्था.१८/ब/वलेप पदोन्नती/पुणे/आस्थापना/पुणे /८८५, दि. ११/१०/२०१२.

२) श्रीमती. म.श.गुरव , स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे यांचा दि. ०१/०४/२०१३ चा विनंती अर्ज.

---

**क्र.स्था-१८ / ब /वलेप /विनंती बदली / पुणे / वलेप - ४/ ५०१**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, कोकणभवन, ६ वा माळा,**
**नवी मुंबई ४०० ६१४**
**दिनांक:-** 14 MAY 2013

**विषय :- वरिष्ठ लेखापरीक्षक संवर्ग बदली व नियुक्ती.**

# आदेश

प्रस्तावनेतील वाचा अ.क्र. १ अन्वये सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे कार्यालयातील **श्रीमती. म.श.गुरव, कनिष्ठ लेखापरीक्षक** यांना कनिष्ठ लेखापरीक्षक संवर्गातून वरिष्ठ लेखापरीक्षक संवर्गात पदोन्नतीने सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, **सोलापूर कार्यालयात रिक्त पदी पदस्थापना देण्यात आली होती.** परंतु श्रीमती. गुरव या सदर आदेशान्वये अद्यापपर्यंत सोलापूर कार्यालयात वरिष्ठ लेखापरीक्षक या पदावर हजर झालेल्या नाहीत.

श्रीमती. म.श.गुरव यांच्या दि. ०१/०४/२०१३ च्या विनंती अर्जानुसार त्यांनी सोलापूर ऐवजी सातारा कार्यालयात वरिष्ठ लेखापरीक्षक या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत विनंती केली आहे. त्यानुसार सदर आदेशान्वये सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे कार्यालयाचा वाचा क्र. १ मधील आदेशातील इतर सर्व बाबी कायम ठेवून श्रीमती. म.श.गुरव यांच्या पदस्थापनेत बदल करुन खाली दर्शविल्याप्रमाणे रकाना क्र. ३ मधील ठिकाणी त्यांची पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र | कर्मचाऱ्यांचे नांव, पदनाम, कार्यालयाचे नांव व ठिकाण | बदली करण्यात येत असलेले पद, कार्यालय व ठिकाण | रकाना क्र. ३ मधील पद रिक्त / उपलब्ध होण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीमती. म.श.गुरव,<br>**कनिष्ठ लेखापरीक्षक,**<br>सहाय्यक संचालक,<br>स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे. | **वरिष्ठ लेखापरीक्षक,**<br>सहाय्यक संचालक,<br>स्थानिक निधी लेखापरीक्षा, सातारा. | पद रिक्त असल्यामुळे |

**श्रीमती. म.श.गुरव, वरिष्ठ लेखापरीक्षक यांना वरिष्ठ लेखापरीक्षक (प्रशासन) या पदाचा कार्यभार देण्यात यावा.**

श्रीमती. म.श.गुरव, वरिष्ठ लेखापरीक्षक यांना त्यांच्या पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे यांनी त्यांचे आदेश क्र. ६५, दि. ०५/११/२०१२ अन्वये कार्यमुक्त केले आहे. तथापि त्या सोलापूर येथील कार्यालयात हजर झालेल्या नाहीत. आता सदर आदेशान्वये त्यांनी तात्काळ पदस्थापनेच्या पदावर हजर व्हावे. त्यांना या संचालनालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणतीही रजा मंजूर करण्यात येऊ नये किंवा त्यांचा मुदतवाढीचा प्रस्तावही सादर करण्यात येऊ नये. त्यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी पदग्रहण केल्याचा अहवाल संबंधित कार्यालय प्रमुखाने या संचालनालयास तात्काळ पाठवावा.

(का.मा.विधाते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत:-

१. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे
२. सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे, सोलापूर, सातारा.
३. संबंधित कर्मचारी.
४. संबंधित कर्मचाऱ्याची वैयक्तिक नस्ती.

**surekha badali २०१३ varishth lekhaparikshak vinanti order**